सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक
कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२२–२३/८७९ दि. १३/१२/२०२२

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : सन २०२२–२३ च्या रासेयो विशेष शिबिरात जनजागृतीपर उपक्रमांचा समावेशाबाबत
संदर्भ : १) क्र.रासेयो–२०२२/प्र.क्र.२२३/साशि–७,दि.१२.१२.२०२२ चे पत्र
२) क्र.रासेयो–२०२२/प्र.क्र.२२४/साशि–७,दि.१२.१२.२०२२ चे पत्र

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या पत्रानुसार रासेयोच्या सन २०२२–२३ या वर्षामधील विशेष शिबिरांचे आयोजन करताना, 'नव–मतदार जनजागृती व नोंदणी कार्यक्रम' आणि 'बालविवाह थांबविणे' या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावेत असे निर्देशित करण्यात आले आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील विशेष शिबिरात या विषयांचा समावेश करून उपक्रम राबवावेत. अधिक माहितीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक माहितीकरिता : मा. राज्य संपर्क अधिकारी रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे पत्र

# महाराष्ट्र शासन

**राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.

Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२- २२६७९५६५

---

क्र.- रासेयो-२०२२/प्र.क्र.२२४/साशि-७ दिनांक- १२.१२.२०२२

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,

राष्ट्रीय सेवा योजना,

सर्व विद्यापीठे/ संचालनालये

**विषय :** विशेष शिबिरात एक दिवस "नव-मतदार जनजागृती व नोंदणी कार्यक्रम" आयोजीत करणेबाबत.

वार्षिक विशेष शिबिरांचे आयोजन करताना, ७ दिवसातील एका दिवशी "नव-मतदार जनजागृती व नोंदणी कार्यक्रम" याचे आयोजन करावे. यात पुढील बाबींचा समावेश करावा-

१)शहर/गावांतील १८ वर्षे पूर्ण झालेल्या नव-मतदारांना नावनोंदणी करण्यास प्रोत्साहित करावे. तसेच १७ वर्षे पूर्ण झालेल्या नव-मतदारांना आगाऊ नोंदणी करण्यास प्रोत्साहित करावे

२)याबाबत संबंधित निवडणूक कार्यालयातील अधिकाऱ्यांना शिबिरस्थळी आमंत्रित करून याविषयाच्या व्याख्यानाचे आयोजन करावे.

३)आवश्यकतेनुसार पोस्टर्स/ चित्रे/ मतदारनोंदणीबाबतचे साहित्य संबंधित निवडणूक कार्यालयातून आणून प्रदर्शन लावावे.

४) प्रभातफेरी काढून जनजागृती करावी.

12/12/22

( डॉ. प्रशांतकुमार वि. वनंजे )

राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मा. क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे

# महाराष्ट्र शासन

**राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.

Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२- २२६७९५६५


क्र.- रासेयो-२०२२/प्र.क्र.२२३/साशि-७ दिनांक- १२.१२.२०२२

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,राष्ट्रीय सेवा योजना,

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
३. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
४. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
५. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय : "बालविवाह थांबविणे" याविषयाच्या जनजागृती कार्यक्रमांचा समावेश विशेष शिबिरांत करणेबाबत.

वार्षिक विशेष शिबिरांचे आयोजन करताना, ७ दिवसातील एका दिवशी "बालविवाह थांबविणे" यासाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात यावेत. यात पुढील बाबींचा समावेश करावा. १) पथनाट्य २) मानवी साखळी ३) चित्र/पोस्टर रंगविणे ४) तज्ञ व्यक्तिंना आमंत्रित करून व्याख्यानांचे आयोजन करणे ५) आवश्यकतेनुसार गावातील युवक/युवतींना जनजागृती कार्यक्रमात सहभागी करणे. याबाबत दि. १७.१०.२०२२ रोजी MGM विद्यापीठ, औरंगाबाद येथे व दि. ३०.११.२०२२ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे युनिसेफ यांच्यासोबत झालेल्या विषयांकित कार्यशाळेत उपस्थित कार्यक्रम अधिकारी यांना याबाबत आवश्यक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणाप्रमाणे आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयातील विशेष शिबिरांत या विषयाचा समावेश करण्यात येऊन कार्यक्रमाचे आयोजन करावे.

सदर जनजागृती कार्यक्रम विशेषत: पुढील १३ जिल्ह्यांमध्ये घेण्यात यावेत- १)औरंगाबाद २)नांदेड ३)परभणी ४)हिंगोली ५)लातूर ६)उस्मानाबाद ७)बीड ८)जालना ९)धुळे १०)जळगाव ११)नंदूरबार १२)नाशिक १३)सोलापूर.

१२/१२/२२

(डॉ. प्रशांतकुमार वि. वनंजे)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

प्रत- मा. क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे